# FIRST INFORMATION REPORT

**Form : 1-A**

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

**No.** 0037074

1. * Dist. / जिल्हा: चंद्रपूर | * P.S. / पोलीस ठाणे: भद्रावती | *Year / वर्ष: 2019 | *FIR No. / पहिली खबर क्र.: 115 | *Date / तारीख: 2/3/2019

2. (i) *Act / अधिनियम: ला.प्र.का. (सुधारित) 2018 | *Sections / कलमे: 7

(ii) *Act / अधिनियम: — | *Sections / कलमे: —

(iii) *Act / अधिनियम: — | *Sections / कलमे: —

(iv) *Other Acts & Sections / इतर अधिनियम व कलमे: —

3.(a) *Occurence of Offence : / अपराधाची घटना: *Day / वार: शुक्रवार | *Date from / तारीख पासून: 1/3/2019 | *Date To / तारीख पर्यंत:

*Time Period / वेळेचा अवधी: [illegible] | *Time From / पासून: 16/44 | *Time To / पर्यंत: [illegible]

(b) Information received at P.S Date / पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख: 2/3/2019 | *Time / वेळ: 00/20 वा.

(c) General Diary Reference Entry No. (s) / सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक: 02/19 | *Time / वेळ: 00/20 वा.

4. Type of information : / माहितीचा प्रकार: लाचेची मागणी करून स्विकारणे | *Written / Oral : / लेखी/तोंडी: लेखी

5. Place of Occurrence : (a) * Direction and Distance from P.S. / घटनेचे ठिकाण / पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर: 1 कि.मी. उत्तर | Beat No. / गस्तक्षेत्र क्र.: [illegible]

(b) *Address: / पत्ता: आरोपी क्र-1 नायब तहसीलदार यांचे कक्ष तहसील कार्यालय भद्रावती

(c) *In case outside limit of this Police Station, then the
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. / पोलीस ठाणे: | Dist.: / जिल्हा:

6. Complainant /Informant : / तक्रारदार / खबरी

(a) Name / नाव: गुरुदेव ढोलेकर

(b) Father's/ Husband's Name / पित्याचे / पतीचे नाव: नारायण ढोलेकर

(c) Date/Year of Birth : / जन्म तारीख / वर्ष: 30 वर्ष | (d) Nationality : / राष्ट्रीयत्व: भारतीय

(e) Passport No. : / पारपत्र क्र.: — | Date of Issue : / दिल्याची तारीख: — | Place of Issue / दिल्याचे ठिकाण: —

(f) Occupation : / व्यवसाय: [illegible]

(g) Address : / पत्ता: 210 शिवाजी नगर, भद्रावती

मो.क्र. 9970285847

)

<u>नक्कल फिर्याद</u>

दिनांक ०१/०३/२०१९

मी, गुरुदेव नारायण घोटेकर, वय ३० वर्षे, व्यवसाय — ट्रॅक्टरने बिल्डीग मटेरीयल वाहतुक करणे रा. शिवाजी नगर भद्रावती ता. भद्रावती जिल्हा चंद्रपूर मो. क्र. ९९७०२८५८४७ असा असून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी राहत असून माझे १० वी पर्यन्तचे शिक्षण झालेले आहे. माझेकडे एम.एच.३३—९९५४ या क्रमांकाचे ट्रक्टर असून ट्रक्टरव्दारे मी रेती, गिटटी, विटा इत्यादी प्रकारच्या मटेरीयल वाहतुकीचे काम करतो. सदर ट्रक्टर चालविण्याकरीता सचिन झिंगरे रा. सुरक्षा नगर भद्रावती हा चालक ठेवलेला आहे.

आज दिनांक ०१.०३.२०१९ रोजी सकाळी ०५.०० वाजता 'माझा ट्रक्टर ड्रायव्हर सचिन व सुंशात नावाच्या रोजदाराने पिंपरी घाटावरुन माझे ट्रक्टरने वाळूने भरुन वाळू भद्रावती येथे वाहतूक करीत असतांना चिरादेवी रेल्वे क्रासीग गेटजवळ अंदाजे सकाळी ०६.०० वाजता भद्रावती तहसिल कार्यालय येथील नायब तहसिलदार व तलाठी हे दोघेही तेथे आले व माझे ड्रॉयव्हरला म्हणाले की, तुम्ही रेती कशी काय वाहतूक करीत आहे अजुन घाटाचे लिलाव झाले नाही तुम्ही रेतीची चोरी करत असून बोलाव तुझ्या मालकाला, तुमच्यावर कार्यवाही करतो असे म्हणाल्याने माझे ड्रायव्हरने मला फोनकरुन वरील हकीकत सागितली. तेव्हा मी तिथे गेलो असता नायब तहसिलदार गौतम शंभरकर व तलाठी खुशाल मस्के तिथे हजर होते. मी तिथे गेल्यानंतर मला नायब तहसिलदार व तलाठी दोघेही म्हणू लागले की तुम्ही रेतीची चोरी करीत आहे, तुमचा ट्रक्टर तहसिल कार्यालयात लावतो व तुमच्यावर कार्यवाही करतो. तेव्हा मी त्यांना माझे विरुध्द कार्यवाही करु नका म्हणून विंनती करु लागलो. तेव्हा नायब तहसिलदार शंभरकर व मस्के तलाठी यांनी मला ५,०००/—रुपये दे, तेव्हाच तुझे ट्रक्टर सोडतो असे म्हणाले तेव्हा माझेकडे येवढे पैसे नाही साहेब कृपया माझे ट्रक्टर सोडून दया असे म्हणून मी त्यांना विंनती करु लागलो त्यावर नायब तहसिलदार शंभरकर व तलाठी मस्के यांनी ठिक आहे आता तुझी ट्रक्टर सोडतो पण त्याकरीता तु आम्हाला आज दुपारपर्यन्त ५,०००/—रुपये तहसिल कार्यालय भद्रावती येथे आणून दे, नाहीतर यानंतर तुझी ट्रक्टर जेव्हा भेटणार तेव्हा आम्ही कार्यवाही करणार असे म्हणाले त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव होकार देवून परत आलो.

माझी लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज दिनांक ०१.०३.२०१९ रोजी सकाळी १०.०५ वाजताचे दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथील श्री. घुगे सा. यांचे मोबाईलवर संपर्क करुन वरील हकीकत सांगितली असता आपण मला आज सकाळी १२.०० वाजता भद्रावती येथील सुमठाणा जवळ थांबून रहा आम्ही पंच व स्टॉफसह भद्रावती येथील सुमठाणा येथे येवून तक्रार घेतो असे सांगितल्याने मी आज दिनांक ०१.०३.२०१९ रोजी सकाळी १२.०० वाजता हजर असताना आपण आले व मी वरील प्रमाणे लेखी तक्रार देत आहे. माझा त्यांचेशी कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नाही. तरी माझे तक्रारीवरुन मला माझे वाळूचे वाहतुक करताना पकडलेल्या ट्रॅक्टरवर कार्यवाही न करता सोडल्याने व यापूढे ही ट्रॅक्टरवर कार्यवाही न करण्याच्या कामाकरीता लाच मागणारे नायब तहसिलदार गौतम शंभरकर व तलाठी खुशाल मस्के, दोघेही तहसिल कार्यालय भद्रावती यांचेविरुध्द कार्यवाही होणेस विंनती आहे.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी सोबतच्या दोन्ही पंचाची व स्टॉफची ओळख करुन त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री. घुगे साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीचा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी पंचासमक्ष लाच

**Form : 1-B**

7. Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

**No.** 0037074

आरोपी क्र. १) गौतम परसराम शंभरकर वय ५५ वर्षे
धंदा-नोकरी (नायब तह. (क्रं २) (२) खुशाल गोविंदराव
मस्के वय ४६ वर्षे धंदा-नोकरी तलाठी (क्रं-३) दोन्ही तहसील

Physical features, deformities and other details of the suspect : कार्यालय भद्रावती
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex<br>लिंग | *Date/Year of Birth<br>जन्मतारीख/ वर्ष | *Build<br>बांधा | *Height in Cms.<br>उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion<br>वर्ण | *Identification Mark(s)<br>ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | – | – | – | – | – |

| *Deformities/Peculiarities<br>व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth<br>दात | *Hair<br>केस | *Eye<br>डोळे | *Habit(s)<br>सवयी | *Dress Habits<br>पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| – | – | – | – | – | – |

| * Languages/Dialect<br>भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark<br>भाजल्याची खूण | *Leucoderma<br>कोड | *Mole<br>तीळ | *Scar<br>व्रण | *Tattoo<br>गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| – | – | – | – | – | – |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.

- A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.

A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. ५,०००/— (रू.५००/— दराच्या १० चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तदनंतर लाचेच्या रकमेस अँथ्रॅसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी पंचनामा क्र. १ मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री.घुगे साहेब यांनी पंचासमक्ष दोन्ही गैरअर्जदाराकडे पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन नापोकॉ. महेश मांढरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. १ यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने पंच क्र. १ सह तहसिल कार्यालय भद्रावती येथे पडताळणी करीता पाठविले असता पडताळणी दरम्यान नायब तहसिलदार गौतम शंभरकर व तलाठी खुशाल मस्के यांनी मला रू. ५,०००/— घेवुन तहसिल कार्यालय भद्रावती येथे बोलाविले. लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. १ यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी पंच क्र. १ व २ यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण नायब तहसिलदार गौतम शंभरकर व तलाठी खुशाल मस्के दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती यांनी माझेकडे वाळूचे वाहतुक करताना पकडलेल्या ट्रॅक्टरवर कार्यवाही न करता सोडल्याने व यापूढे ट्रॅक्टरवर कार्यवाही न करण्याच्या कामाकरीता रू.५,०००/— लाच रकमेची मागणी करून थोडयाच वेळात लाच रक्कम रू. ५,०००/— स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून नायब तहसिलदार गौतम शंभरकर व तलाठी खुशाल मस्के दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती यांचेविरूद्ध पुढील सापळा करण्याचे ठरविण्यात आले. त्यावेळी मला अँथ्रॅसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे फुलपॅन्टच्या उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर माझे खिशातून रुमाल काढुन चेहरा पुसुन हातातच रुमाल ठेवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा—यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांचे सुचनेवरुन नापोकॉ. महेश मांढरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. १ यांचे आवाजात सापळा कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवून मला माझे मोटार सायकलने मला पंच क्र. १ यांचेसह तहसिल कार्यालय भद्रावती जिल्हा चंद्रपूर येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ तहसिल कार्यालय भद्रावती येथे गेलो असता गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, व खुशाल गोविदराव मस्के, तलाठी दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती यांनी बोलाविले. त्या ठिकाणी मी गेलो असता गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, व खुशाल गोविदराव मस्के, तलाठी दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती हे त्यांचे कार्यालयात हजर होते. त्यांचेशी बोलणी दरम्यान त्यांनी रू. ५,०००/— लाचेची रक्कमेची मागणी केली. त्यावरून मी अँथ्रॅसिन पावडर लावलेल्या रू. ५,०००/— रक्कम माझे फुलपॅटच्या उजव्या खिश्यातुन काढुन गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, व खुशाल गोविदराव मस्के, तलाठी दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती यांना दिल्या असता गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, यांनी लाच रक्कम रू.५,०००/— आपल्या उजव्या

**Form : 1-C**

No. 0037074

8. Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

लागू नाही

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :

—

—

—

10. *Total value of properties stolen/involved :
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य : —

11. *Inquest Report/U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल/ यू. डी. प्रकरण क्र. जर असल्यास : —

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ):
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) हकिगत याप्रमाणे आहे की, यातील
हलना बोली व हिंगोली फिर्यादी यांनी वाळूचे वाहतुक करतांना पकडलेल्या
ट्रॅक्टरवर कारवाई न करता सोडल्याने व यापुढे ट्रॅक्टरवर कारवाई
न करण्याच्या कामाकरीता तहसील कार्यालय महागांव येथील आरोपीत 1)
गौतम परसराम शेंबरकर वय 55 वर्षे धंदा-नोकरी. नायब तहसीलदार आरोपीत 2)
रघुनाथ गोविंदराव मस्के वय 56 वर्षे धंदा-नोकरी. तलाठी असे रुपये 4000/- ची
लाच रकमेची मागणी करुन आरोपी क्र. 1) गौतम परसराम शेंबरकर वय 55 वर्षे
धंदा नोकरी नायब तहसीलदार यांनी स्वतः लाच रक्कम स्विकारली व त्यांना मिळालेल्या
अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग केला म्हणून गुन्हा

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. registered the case and took up the investigation/directed ............ Rank ............ to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S. ............ on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले पो. उप. अधिक्षक
पदनाम ज्ञानदेव माणिकराव घुगे यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला. लाच-लुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली ........ पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.
मुद्यावर

F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

[signature]

Signature of the Officer in charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

[signature]

*Name : सुनिल वनवे
नाव

*Rank : हवालदार No. 2989
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : 2/3/16 रोजी 11/00 वा.
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

हाताने घेवुन मोजुन ते बसुन असलेल्या टेबलच्या उजव्या बाजुच्या टेबलच्या डाव्हरमध्ये ठेवले. त्यानंतर मी त्यांना माझे ट्रॅक्टरवर आता कार्यवाही करु नका असे म्हणालो असता त्यांनी मला होकार दिला. त्यानंतर मी सापळा पथकास माझे खिशातून रुमाल काढुन चेहरा पुसुन हातातच रुमाल ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, व खुशाल गोविदराव मस्के, तलाठी दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री. घुगे साहेब यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी गौतम शंभरकर, नायब तहसिलदार, व खुशाल गोविदराव मस्के, तलाठी दोन्ही तहसिल कार्यालय भद्रावती यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून माझे ट्रॅक्टरने वाळूचे वाहतुक करताना पकडलेल्या ट्रॅक्टरवर कार्यवाही न करता सोडल्याने व यापूढे ट्रॅक्टरवर कार्यवाही न करण्याच्या कामाकरीता रू.५,०००/— लाच रकमेची पंचासमक्ष मागणी करून माझेकडुन लाचेची रक्कम रू. ५,०००/— स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

वरील लेखी फिर्यादवरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला. प्रथम खबरीची प्रत मा.विशेष न्यायालय, वरोरा यांना सादर आहे. तपास डायरी पुढील तपास कामी श्री. ज्ञानदेव माणिकराव घुगे, पोलीस उपअधिक्षक, लाच—लुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय चंद्रपुर यांचेकडे देण्यात आली.